आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२८ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गुजरातमधे वडोदरा इथं C-295 लष्करी विमानांच्या निर्मितीसाठीच्या टाटा एअरक्राफ्ट संकुलाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्या हस्ते उद्घाटन / विविध मुद्यांवर उभय नेत्यांमधे चर्चा

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून आणखी २५, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ७ उमेदवारांची यादी जाहीर

- आपल्या कोट्यातल्या ४ जागा मित्रपक्षांना द्यायचा भाजपाचा निर्णय

- सार्वजनिक जीवनातली सचोटी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाला चालना देण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता सप्ताह

**आणि**

- शेअर बाजार पुन्हा तेजीत /सेन्सेक्समधे ६०३ अंकांची, तर निफ्टीत १५८ अंकांची वाढ

**<><><><><>**

गुजरातमधे वडोदरा इथं C-295 लष्करी विमानांच्या निर्मितीसाठी तयार करण्यात आलेल्या टाटा एअरक्राफ्ट संकुलाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्या हस्ते आज झालं. टाटा एअरबस प्रकल्प हा मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत लष्करी विमानांसाठीचा भारतातला खाजगी क्षेत्रातला पहिला एरोस्पेस प्रकल्प आहे.  भारत आणि स्पेनदरम्यान संरक्षणक्षेत्रातले संबंध या प्रकल्पामुळे अधिक दृढ होतील, त्याचप्रमाणे मेक इन इंडियालाही बळ मिळेल, असं

प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले. भारत साऱ्या जगासाठी विमानं तयार करील तो दिवस फार दूर नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्तानं दोन्ही नेत्यांनी विमानतळापासून टाटा एअरक्राफ्ट संकुलापर्यंत रोड शो केला. भारताच्या विमान उद्योग क्षेत्राची दारं या प्रकल्पामुळे युरोपातल्या कंपन्यांसाठी खुली झाली असल्याची प्रतिक्रीया स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांनी नोंदवली.

**<><><><><>**

स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी त्यांची प्रतिनिधी मंडळ स्तरावर चर्चा झाली. महितीतंत्रज्ञान आणि नवोन्मेष, संरक्षण, सुरक्षा, पुनर्नवीकरणीय ऊर्जा आणि परस्पर हिताच्या जागतिक मुद्यांवरही उभय नेत्यांनी चर्चा केली.

परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे सचिव तन्मय लाल यांनी बातमीदारांना सांगितलं की, भारत आणि स्पेन यांच्यातला व्यापार १० अब्ज डॉलर्सवर पोचला असून भारतात सुमारे २४० स्पॅनिश कंपन्यांच अस्तित्व आहे, असं त्यांनी सांगितलं.

परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर हे देखील सांचेझ यांना भेटून चर्चा करणार आहेत. या दौऱ्यात स्पेनचे प्रधानमंत्री मुंबईलाही येणार असून विविध उद्योजक, व्यापारी आणि मनोरंजन जगतातल्या मान्यवरांशी चर्चा करणार आहेत. सांचेझ यांच्या उपस्थितीत भारत आणि स्पेन दरम्यान उभयपक्षी सहकार्याचे महत्त्वाचे करार होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. वर्सोव्यातून भारती लव्हेकर, घाटकोपर पूर्वमधून पराग शाह,

माळशिरसमधून राम सातपुते, आष्टीतून सुरेश धस, सावनेरमधून आशिष देशमुख यांच्यासह इतरांची नावं यात आहेत. बोरीवलीतून संजय उपाध्याय, कारंज्यातून सई डहाके, वसईतून स्नेहा दुबे, लातूरमधून अर्चना पाटील- चाकूरकर यांना उमेदवारी मिळाली आहे. भाजपानं आतापर्यंत १४६ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपानं संतुक हंबर्डे यांचं नाव जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं विधानसभा निवडणुकीसाठी ७ उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. माणमधून प्रभागर घार्गे, काटोलमधून माजी मंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख, तर खानापूरमधून वैभव पाटील यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे. दौंडमधून रमेश थोरात, वाईतून अरुणादेवी पिसाळ, पुसदमधून शरद मैंद, तर सिंदखेडा इथून संदीप बेडसे निवडणुकीच्या रिंगणात असतील.

**<><><><><>**

भाजपानं त्यांच्या कोट्यातल्या ४ जागा मित्रपक्षांना द्यायचा निर्णय घेतला आहे. त्यात बडनेराची जागा युवा स्वाभिमान पार्टी, गंगाखेडची जागा राष्ट्रीय समाज पक्षाला, कलिनाची जागा रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टीला आणि शाहुवाडीची जागा जनसुराज्य शक्ती पक्षाला दिली आहे. यासंदर्भातलं पत्रक पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी प्रसिद्ध केलंय.

दरम्यान, रिपब्लिकन पक्षाला शिवसेनेच्या कोट्यातून धारावी आणि भाजपाच्या कोट्यातून कालिना हे दोन मतदार संघ दिल्याचा दावा रामदास

आठवले यांनी केला आहे. मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. महायुतीची सत्ता आल्यानंतर त्यांच्या पक्षाला एक विधानपरिषद सदस्यत्व, राज्यात एक कॅबिनेट मंत्री पद तसेच 4 महामंडळांची अध्यक्ष पदे आणि महामंडळ संचालक याशिवाय इतर विविध पदं दिली जाणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे आश्वासन दिल्याचं ते यावेळी म्हणाले. रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महायुतीला विजयी करण्यासाठी प्रचाराला लागावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

सार्वजनिक जीवनातली सचोटी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाला चालना देण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता सप्ताह पाळण्यात येत आहे. राष्ट्राच्या भरभराटीसाठी एकात्मतेची संस्कृती विकसित करणं ही या सप्ताहाची संकल्पना आहे. सुशासन तसंच प्रशासनात नैतिकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी अधिक संवेदनशीलतेची गरज लक्षात घेऊन हा सप्ताह आयोजित केला आहे. विविध मंत्रालयं, विविध सरकारी विभाग, सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या, बँका आणि इतर संस्थामधले सरकारी अधिकाऱ्यांनी आज शपथ घेतली. तसंच भ्रष्टाचारविरोधात जागृतीसाठी आठवडाभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

दरवर्षी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवड्यात हा सप्ताह आयोजित केला जातो.

केंद्रीय दक्षता आयोगाचे आयुक्त प्रवीण कुमार श्रीवास्तव आणि दक्षता आयुक्त ए एस राजीव यांनी आयोगाच्या नवी दिल्लीतल्या मुख्यालयात अधिकाऱ्यांना तर आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पलिवाल गौर यांनी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं अधिकाऱ्यांना शपथ दिली.

**<><><><><>**

पाच दिवसांच्या मंदीनंतर आज देशातले शेअर बाजार तेजीत बंद झाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ६०३ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ५ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १५८ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ३३९ अंकांवर बंद झाला. बँक, वस्तू, दूरसंवाद, आरोग्य क्षेत्रातल्या कंपन्यांना या तेजीचा फायदा झाला.

**<><><><><>**

देशभरात दीपावलीच्या मंगलपर्वाला आज, गोवत्स द्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून प्रारंभ झाला. आज, गायवासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. येत्या रविवारपर्यंत चालणाऱ्या या प्रकाशोत्सवानिमित्त महाराष्ट्रात सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. मनोवेधक रोषणाईनं बाजारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या या बरोबरच कपडे, दागिने खरेदीसाठी लगबग दिसून येत आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुजरातमधे अमरेली इथं सुमारे चार हजार आठशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन केलं. विविध रस्ते, रेल्वे आणि पाणीपुरवठा प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. जलसंवर्धनासाठी केंद्ररकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमात केला. पोरबंदर जिल्ह्यात कारली इथं मोकरसागर या जल पुनर्भरण तलावाच्या कामाची पायाभरणी, तसंच धोळकिया प्रतिष्ठान तर्फे अमरेलीमधे दुधाला इथं विकसित करण्यात आलेल्या भारत माता सरोवराचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज विविध उमेदवारांनी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती मतदारसंघातून आज उमेदवारी अर्ज दाखल केला. बारामतीतून महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांनीही अर्ज दाखल केला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी मतदारसंघातून अर्ज भरला. खासदार नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे यांनी कुडाळमधून. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी माहीममधून अर्ज दाखल केला.

**नवी मुंबईत**ल्या ऐरोली विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे विद्यमान आमदार गणेश नाईक यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून, तर बेलापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संदीप नाईक यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

दरम्यान, औरंगाबाद मध्य विधान सभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार किशनचंद तनवाणी यांनी निवडणूकीतून माघार घेतली आहे. आपल्या मतदार संघात २०१४ च्या निकालाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आपण माघार घेत असून, पक्ष जो उमेदवार देईल, त्याच्या पाठिशी भक्कमपणे उभं राहू, असं तनवाणी यांनी जाहीर केलं.

<><><><><>

काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री आमदार अनिस अहमद यांनी आज वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत मुंबईत राजगृह इथं हा पक्ष प्रवेश झाला. अनिस अहमद यांना वंचित बहुजन आघाडीनं नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांची छाननी आज झाली. झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी भाजपानं आज उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली.

//<><><><><>//